आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२६ एप्रिल २०२६ - शनिवार

**ठळक बातम्या**

- केवायसी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी सर्व वित्तीय नियामकांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांचं आवाहन

- पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठीच्या प्रचाराला वेग

- छत्तीसगडमध्ये सक्रीय असलेल्या ४७ नक्षलवाद्यांचं हैदराबादमधे आत्मसमर्पण

**आणि**

- ‘मन की बात’ कार्यक्रमाद्वारे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या देशवासियांशी संवाद साधणार

**<><><><><>**

केवायसी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी आणि नागरिकांना वारंवार केवायसी करावं लागू नये यासाठी देशातल्या सर्व वित्तीय नियामकांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत, असं आवाहन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज केलं. सेबीच्या स्थापना दिनानिमित्त मुंबईत आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. देशातला एखादा शेअर बाजार, शेअर दलाल किंवा संबंधितांवर सायबर हल्ला झाला, तर त्यामुळे होणारं नुकसान भरून यायला मोठा काळ जाऊ शकतो. त्यामुळे सायबर हल्ले, कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे निर्माण झालेल्या आव्हानांचा सामना करण्यासाठी सेबीनं मजबूत यंत्रणा तयार करावी, अशी सूचना त्यांनी केली. सीमेपलीकडून होणाऱ्या गैरव्यवहारांचा सामना करण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या नियामकांशी संपर्क वाढवावा, असंही सीतारमण यांनी सांगितलं. गुंतवणूकदारांमध्ये जागृती करण्यासाठीच्या सेबीच्या अभियानाचा प्रारंभ यावेळी अर्थमंत्र्यांनी केला. देशातले सर्व शेअर बाजार, म्युच्युअल फंड संघटना आणि इतर संस्थांच्या मदतीनं हे अभियान राबवलं जाणार आहे.

<><><><><>

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठीचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. सर्वच प्रमुख राजकीय पक्षांचे नेते प्रचारसभा आणि रोड शो घेत आहे.

भाजपाचे नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पूर्व वर्धमानमध्ये प्रचारसभा घेतली. राज्यात भाजपचं सरकार आल्यास समान नागरी कायदा तसंच सातवा वेतन आयोग लागू केला जाईल असं त्यांनी सांगितलं. मतुआ समुदायालाही पाठबळ दिलं जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी हुगळी इथं प्रचारसभा घेतली. रिक्त सरकारी पदं भरण्याचं आश्वासन त्यांनी दिलं. विद्यमान सरकारमुळे राज्यात कोणीही सुरक्षित नसल्याचं ते म्हणाले. भाजपचे नेते जे. पी. नड्डा, राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन आणि उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनीही वर्धमान आणि उत्तर २४ परगणा जिल्ह्यात सभा घेतल्या.

तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्ष आणि मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, पक्षाचे नेते अभिषेक बॅनर्जी यांनीही प्रचारसभा घेतल्या. तृणमुलनं दिलेल्या कायदेशीर लढ्यामुळे ३२ लाख मतदारांची नावं पुन्हा मतदार यादीत आल्याचं त्यांनी सांगितलं. केंद्र सरकार राज्याचा विकास निधी रोखून धरत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनीही श्रीरंगपूर इथं प्रचारसभा घेतली, आपला पक्ष राज्यघटना आणि एकतेसाठी वचनबद्ध असल्याचं ते म्हणाले. भाजपा द्वेष आणि विभाजनाचं राजकारण करत असल्याची टीकाही त्यांनी केली.

<><><><><>

नीती आयोगाच्या उपाध्यक्षपदी अशोक कुमार लाहिरी यांची नियुक्ती झाली आहे. आज त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. लाहिरी यांच्याशिवाय

नीती आयोगाचे पूर्णकालीन सदस्य म्हणून राजीव गौबा, के. व्ही. राजू, गोवर्धन दास, अभय करंदीकर आणि एम. श्रीनिवास यांचीही नियुक्ती करण्यात आली आहे.

<><><><>

तेलंगणा जागृती या संघटनेच्या अध्यक्ष आणि माजी मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांच्या कन्या के. कविता यांनी आज 'तेलंगणा राष्ट्र सेना' या नव्या राजकीय पक्षाची घोषणा केली. हैदराबादमध्ये आयोजित एका कार्यक्रमात त्यांनी पक्षाच्या नावाचं अनावरण केलं. कालेश्वरम उपसा सिंचन प्रकल्पाच्या मुद्द्यावरून झालेल्या वादानंतर के. कविता यांची भारत राष्ट्र समिती या पक्षातून हकालपट्टी झाली होती.

<><><><>

न्यायपालिका आणि तिच्याशी संबंधित संस्थांबद्दल नागरिकांच्या मनात प्रचंड विश्वास असून तो राखणं आणि वाढवणं ही या व्यवस्थेतल्या सर्वांची सामायिक जबाबदारी आहे, असं प्रतिपादन सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत यांनी आज केलं. जयपूर इथल्या कॉन्स्टिट्यूशन क्लबमध्ये ‘द बेंच बियाँड रिटायरमेंट’ या विषयावरच्या चर्चासत्रात ते बोलत होते. नागरिकांमध्ये कायद्याविषयी जागृती करणं अतिशय महत्त्वाचं असून माजी न्यायाधीश मध्यस्थाची भूमिका चांगल्या पद्धतीनं पार पाडू शकतात, असंही सरन्यायाधीशांनी सांगितलं.

<><><><>

छत्तीसगडमध्ये सक्रीय असलेल्या ४७ नक्षलवाद्यांनी आज हैदराबाद इथं तेलंगणचे पोलीस महासंचालक शिवधर रेड्डी यांच्या उपस्थितीत आत्मसमर्पण केलं. यात नक्षलवादी नेते, तसंच महिलांचा समावेश आहे. या नक्षलवाद्यांनी ३० पेक्षा जास्त शस्त्रास्त्रंही पोलिसांकडे सुपूर्द केल्याची माहिती रेड्डी यांनी दिली.

<><><><>

विद्यार्थ्यांनी  चिकित्सकपणे विचार करावा , नैतिकतेने आचरण करावं आणि जीवनभर  अध्ययन करावं, असं  आवाहन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन

यांनी आज केलं.  जयपूर इथं  राजस्थान विद्यापीठाच्या ३५ व्या दीक्षांत समारंभात ते बोलत  होते. ज्ञानाचा उपयोग समाजाच्या उन्नतीसाठी, नवनिर्मितीसाठी व्हायला हवा, विद्यार्थ्यांनी  रोजगार निर्माण करणारे बनावं,  अमली पदार्थांपासून दूर राहावं, समाजमाध्यमांचा वापर जबाबदारीने,  धायकपणे करावा, असंही ते यावेळी म्हणाले.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधतील. हा या कार्यक्रमाचा १३३ वा भाग असून त्याचं थेट प्रसारण आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर, एआयआर न्यूज या संकेतस्थळावर आणि न्यूज ऑन एअर मोबाईल ॲपवर केलं जाणार आहे. त्याचप्रमाणे AIR न्यूज, डीडी न्यूज तसंच प्रधानमंत्री कार्यालय आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या यूट्यूब वाहिन्यांवरून हा कार्यक्रम थेट प्रक्षेपित होईल.

**<><><><>**

जनगणना २०२७ साठी १-८-५-५ हा राष्ट्रीय निःशुल्क मदत क्रमांक सुरू केला आहे. देशभरातली सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये हा क्रमांक वापरता येणार आहे. या क्रमांकावरून गृहसूची आणि गृहगणना प्रक्रियेबाबत इंग्रजीसह प्रादेशिक भाषांमधून मार्गदर्शन उपलब्ध करून दिलं जाईल. जनगणनेच्या महत्त्वाच्या राष्ट्रीय कार्यात नागरिकांना सुलभतेनं सहभाग घेता यावा, आणि त्यांच्या शंकांचं निरसन करता यावे या उद्देशानं ही सुविधा सुरु केली गेली आहे.

**<><><><>**

आध्यात्मिक गुरु आणि नारायण गुरुकुलमचे प्रमुख गुरू मुनी नारायण प्रसाद यांचं आज केरळच्या तिरुवनंतपुरम इथं निधन झालं. ते ८७ वर्षांचे होते. पेशाने स्थापत्य अभियंते असलेले नारायण प्रसाद यांनी १९६८मध्ये नारायण गुरुकुलममध्ये प्रवेश केला आणि १९९९ मध्ये ते या संस्थेचे प्रमुख झाले. मुनी

नारायण प्रसाद यांनी भारतीय तत्वज्ञानावर १०० हून अधिक पुस्तकं लिहिली आहेत. त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना पद्मश्री आणि केरळ साहित्य अकादमी पुरस्कारासह इतर अनेक पुरस्कारांनी गौरवण्यात आलं होतं.

**<><><><>**

इराणचे परराष्ट्र व्यवहार मंत्री अब्बास अराघची यांनी आज पाकिस्तानचे फील्ड मार्शल असीम मुनीर यांची इस्लामाबाद इथं भेट घेतली. इराणच्या वरिष्ठ शिष्टमंडळासह इराणचे उप परराष्ट्र व्यवहार मंत्री काझमी गरिबाबाडी, परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बघाई आणि राजदूत रझा अमीरी मोघदम उपस्थित होते.

अमेरिकेचे विशेष दूत स्टीव्ह विटकॉफ आणि जॅरेड कुशनर इराणशी चर्चा करण्यासाठी इस्लामाबादला जाणार असल्याचं अमेरिकेनं सांगितलं आहे. अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स वॉशिंग्टनमधून समन्वय साधणार असल्याची माहिती व्हाइट हाऊसच्या प्रेस सेक्रेटरी कॅरोलाइन लिव्हिट यांनी दिली आहे.

**<><><><>**

युक्रेन मधल्या डनीप्रो प्रांतात रशियानं केलेल्या ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यांमध्ये आज  चार जण ठार झाले तर २१ जण जखमी झाले. अकरा जणांवर रुग्णालयात उपचार सुरु असल्याचं युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांनी सांगितलं. दरम्यान रशियामध्ये बेलगोरोड प्रांतात झालेल्या ड्रोन  हल्ल्यात एक महिला ठार झाली असून एक नागरिक जखमी झाल्याचं वृत्त आहे.

**<><><><>**

इस्रायलच्या ताब्यात असलेल्या वेस्ट बँक आणि गाझा पट्टीतील  देइर अल-बलाह या भागात आज नगरपालिका निवडणुकांसाठी मतदान होत आहे. गाझा युद्ध सुरू झाल्यापासून पॅलेस्टिनी प्रदेशात होणारी ही पहिलीच निवडणूक आहे. हमासनं गाझाचा ताबा घेतल्यापासून तिथं कोणतीही निवडणूक झाली नाही, तर २०२३

मध्ये इस्रायल आणि हमास यांच्यात युद्ध सुरू झाल्यापासून वेस्ट बँक इथंही पहिल्यांदाच मतदान होत आहे. वेस्ट बँकमध्ये सुमारे १५ लाख, तर गाझा पट्टीत ७० हजार नोंदणीकृत मतदार असल्याची माहिती तिथल्या निवडणूक यंत्रणेनं दिली आहे.

<><><><><>

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज पंजाब किंग्जनं दिल्ली कॅपीटल्सवर सहा गडी राखून विजय मिळवला. या सामन्यात दिल्लीनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना, के.एल. राहूल याची नाबाद दीडशतकी तर नितीश राणा यांच्या ९१ धावांच्या खेळीच्या जोरावर २० षटकांत २ बाद २६४ धावा केल्या.

विजयासाठी २६५ धावांचा पाठलाग करताना, दिल्लीच्या सलामीवीरांनी धडाकेबाज सुरुवात करत केवळ ६ षटकं आणि पाच चेंडूत १२६ धावांची सलामी दिली. प्रभसीमरन आणि कर्णधार श्रेयस अय्यर यांची अर्धशतकी खेळी आणि प्रियांश आर्याच्या ४३ धावांच्या जोरावर पंजाबनं १८ षटकं आणि ५ चेंडूतच विजयी लक्ष गाठलं.

स्पर्धेत आज जयपूर इथं राजस्थान रॉयल्स आणि सनरायजर्स हैद्राबाद यांच्यातल्या सामन्यालाही सुरुवात होईल. या सामन्यात हैद्राबादनं नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

//<><><><><>//